CRL9860616

विषय :- अकृषिक आकारणी -

ज्या अकृषिक प्रयोजनासाठी जागेचा वापर अंशत: वा संमिश्र स्वरूपात केला जात असेल त्यांच्या प्रमाणानुसार अकृषिक आकरणी करणेबद्दलच्या सूचना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग.

परिपत्रक क्र. एनपी-३४८१/१३०४२/सीआर/५१२/ल-२, दि. १६.६.८६.

परिपत्रक -

जिल्हाधिकारी पुणे यांनी नागरी क्षेत्राचे झपाट्याने औद्योगिकरण होत आहे आणि त्यामुळे काही भूखंड धारक नागरी क्षेत्रामधील जागेचा वापर अंशत: निवासी-नि-औद्योगिक अथवा निवासी नि-वाणिज्यिक आदि वेगवेगळ्या प्रकारच्या व वेगवेगळ्या प्रमाणांत संमिश्र प्रयोजनासाठी करीत आहेत असे शासनाने निदर्शनास आणून दिले आहे. शासन निर्णय महसूल विभाग क्र. एनएए-१२५३ दि. १०.८.१९५३ मधील परिच्छेद क्र. ३ [दोन] [संबंधित उतारा जोडलेला आहे] नुसार ज्यावेळी भूखंड धारकाकडून जागेचा वापर संमिश्र अकृषिक प्रयोजनासाठी होत असेल त्यावेळी संबंधित जागेचा जो प्रमुख अकृषिक वापर निश्चित होत असेल त्याप्रमाणे त्या संपूर्ण भूखंडासाठी अकृकषिक आकारणी करावयाची असे आदेश ह्यापूर्वी दिलेले होते. त्या आदेशाचा गैरफायदा काही भूखंड धारकानी घेऊन शासनाला संबंधित भू-खंड धारकाकडून कायदेशीरपणे जो अधिक महसूल मिळणे क्रमप्राप्त होत असे त्याला मुकावे लागते असे कळविले आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यादृष्टिने शा. निर्णय महसूल विभाग क्र. एनएए-१२५३ दि. १०.८.५३ मध्ये योग्य ती दुरुस्ती करावी असा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे.

२. शासनाने सदरहू प्रस्तावाचा सर्वकष विचार करून आणि कायदेशिररित्या काही अडीअडचणी निर्माण होतील अगर कसे याबाबत विधी व न्याय विभागाशी शहानिषा करुन तपासणी केली आहे. सदरहू अभिप्रायाचे अनुषंगाने शासनाचे असे आदेश आहेत कि, अकृषिक प्रयोजनासाठी जागेचा होत असलेला वापर विचारात घेऊन कशा पध्दतीने अकृषिक आकारणी करावयाची याबद्दलची तरतूद म. ज. म. अधिनियम १९६६

जाईल त्यावेळी भूखंडाचा अंशत: वेगवेगळ्या प्रयोजनासाठी होणारा अकृषिक वापर लक्षात घेऊन संबंधित अकृषिक प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या प्रमाण दराप्रमाणे अंशत: वापर होत असलेल्या क्षेत्रासाठी आकारणी करणे संबंधित तरतुदींना अनुरूप आणि कायदेशीर होईल. जेव्हा नागरी विभागातील भूखंडाचा वेगवेगळ्या प्रकारच्या अकृषिक प्रयोजनासाठी उपयोग केला जाईल तेव्हा केलेल्या वेगवेगळ्या अकृषिक प्रयोजनाच्या प्रमाणानुसार संबंधित अकृषिक प्रयोजनासाठी निश्चित केलेला प्रमाणदर लक्षात घेऊन अकृषिक आकारणी ठरवावी लागे. त्यामध्ये मजले असलेल्या व वेगवेगळे मजले वा त्याचे भाग वेगवेगळ्या प्रयोजनासाठी वापरण्यांत येत आहेत, अशा इमारतीचाही समावेश राहील.

३. वरील परिस्थितीत शा. नि. महसूल विभाग क्र. एनएए-१२५३, दिनांक १०.८.५३ चे आदेशामधील परिच्छेद ३ [२] मध्ये आता बदल करण्यांत येत आहे.

४. सर्व जिल्हाधिकारी यानी वरील आदेशाचे अनुषंगाचे ज्यावेळी भूखंडाचा संमिश्र अकृषिक प्रयोजनासाठी वापर होत असेल [त्यामध्ये मजले असलेल्या इमारतीचाही समावेश राहील] त्यावेळी अंशत: होणा-या प्रयोजनाच्या अनुषंगाने संबंधित नागरी क्षेत्रामध्ये प्रचलित असणा-या अकृषिक आकारणीचे प्रमाण दराप्रमाणे आकारणी करण्याची कार्यवाही करावी.

५. हे आदेश सर्व महसुली अधिकारी यांचे निदर्शनास आणण्यांत यावेत.

महाराष्ट्राचे शासनाचे राज्यपाल यांचे नांवाने व आदेशानुसार.

सही/- श्री. श्री. सरदेसाई,
कार्यासन अधिकारी.
महसूल व वन विभाग.

खरी नक्कल.